केंद्र पुरस्कृत आय.सी.टी.योजनेसाठी नियुक्त केलेल्या **Third Party Audit** संस्थेस निधी वितरीत करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः आयसीटी - २०१४/प्र.क्र.२५ भाग-१/एस.डी.१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २८ मार्च, २०१९

संदर्भ :-

१) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१०/प्र.क्र.३३/संगणक, दि. १५/०४/२०१०
२) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१०/प्र.क्र.३३/संगणक, दि. ०८/०३/२०११
३) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. २५/०३/२०१३
४) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. ०७/११/२०१३
५) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. ११/११/२०१३
६) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. ०१/०३/२०१४
७) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. १४/०८/२०१४
८) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. ०५/०२/२०१५
९) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. ११/०५/२०१५
१०) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. २५/०८/२०१५
११) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. १८/१२/२०१५
१२) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. २७/१०/२०१६
१३) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. ६/१२/२०१६
१४) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. २३/०३/२०१७
१५) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. ०५/१२/२०१७
१६) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. २२/०३/२०१८
१७) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२/०४/२०१८
१८) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५ भाग-१/एस.डी.१, दि. १३/०२/२०१९ व दि.२८/०२/२०१९
१९) केंद्र शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली आदेश क्रमांक: F.No-७-८/२०१८-IS-१२(GEN), दि.१८/०३/२०१९
२०) समग्र शिक्षा कार्यालयाचे पत्र क्र.समग्र शिक्षा/ICT@school/TPA/KIPL/२०१८-१९/(२८/०६) /३५३, दि.१५/०३/२०१९

शासन निर्णय -

राज्यामध्ये केंद्र पुरस्कृत आयसीटी योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये BOOT तत्वावर व्हेंडर्स नियुक्त करुन त्यांच्यामार्फत शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा चालविण्यात येतात. सदर संगणक प्रयोगशाळेमधून विदयार्थ्यांना संगणकाचे शिक्षण आणि संगणकामार्फत नियमित शालेय शिक्षण देण्याची कार्यवाही करण्यात येते. सदर योजनेच्या अंमलबजावणीची तपासणी करण्यासंदर्भात Third Party Evaluation / Audit करण्यासाठी दि.०१/०३/२०१४ व दि.१४/०८/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मे.क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद (आताचे नाव मे. क्रिश इंट्राट्रेड प्रा.लि. औरंगाबाद) या संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार या संस्थेने योजनेचा टप्पा- ३ अंतर्गत स्थापन केलेल्या ४५५८ संगणक प्रयोगशाळांपैकी २०७४ संगणक प्रयोगशाळांची तपासणी केलेली आहे. सदर कामासाठी रु.९८,१०,०२०/- (रु.अठ्ठयान्नव लाख दहा हजार वीस फक्त) इतका निधी मे.क्रिश इंट्राट्रेड प्रा.लि., औरंगाबाद यांना वितरीत करण्याचा प्रस्ताव समग्र शिक्षा, मुंबई यांच्या दिनांक १५/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे. मे.क्रिश इंट्राट्रेड प्रा.लि., औरंगाबाद या संस्थेस रु.९८,१०,०२०/- (रु.अठ्ठयान्नव लाख दहा हजार वीस फक्त) इतका निधी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१८-१९ या चालू आर्थिक वर्षाकरिता "मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, ८०० इतर खर्च, (००) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (००) (०७) शाळांमध्ये माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान योजना कार्यान्वित करणे (केंद्र हिस्सा) (२२०२ ३७९१) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षातंर्गत रु.१३४४४ लाख इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. यामधून रु.९८,१०,०२०/- (रु.अठ्ठयान्नव लाख दहा हजार वीस फक्त) इतका खर्च भागविण्यात यावा.

३. सदर आदेश वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०२/०४/२०१८ रोजीच्या परिपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील अटींची तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील १, २, ३,४,५, ६ व ७ मधील बाबी या आदेशासाठी लागू नाहीत. परिपत्रकातील परिच्छेद-७ (६) नुसार केंद्र शासनाचा निधी प्राप्त झाला असल्याचे अभिप्राय वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.१४३/अर्थोपाय, दि.२७/०३/२०१९ अन्वये दिलेले आहेत.

४. सदर खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०२/०४/२०१८ रोजीच्या परिपत्रकातील सूचना नुसार करण्यात यावा. यासाठी अवर सचिव / कक्ष अधिकारी (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी व सह सचिव (प्रशासन) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२८१८००५५६५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Umeshrao Gaikwad

Digitally signed by Santosh Umeshrao Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d60828c41033ab1da6d64ef17879745d578b334c05c1e8151ef933f134060bc, serialNumber=bc8833f9e213a7e4dfb9d2b071c9202ea52a04054e53b0c1bbf9e50c90a2cf5c, cn=Santosh Umeshrao Gaikwad
Date: 2019.03.28 18:03:25 +05'30'

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
३) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
५) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
६) राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा, चर्नीरोड, मुंबई
७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र½, मुंबई, नागपूर
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र½, मुंबई / नागपूर
९) सह सचिव (प्रशा.), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-६३
११) अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२) सर्व वरिष्ठ लेखापरीक्षक (शिक्षण विभाग)
१३) अवर सचिव/कक्ष अधिकारी (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) वित्त विभाग (व्यय-५)/नियोजन विभाग
१५) अर्थसंकल्प कार्यासन / निवड नस्ती